मंगळवार, 25 ऑक्टोबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक -79
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 25 OCTOBER 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-79 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-12 • PRICE-5


# आम्ही शांततेचे पुरस्कर्ते : मोदी

## पंतप्रधानांची कारगील येथे सैनिकांसोबत दिवाळी

आधुनिक केसरी न्यूज

**कारगील : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी कारगील येथे जाऊन देशाच्या सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली. येथे त्यांनी सैनिकांना संबोधित केले. यावेळी त्यांनी देशाची अर्थव्यवस्था, विकास, सीमा सुरक्षा, भारताचे सामर्थ्य अशा वेगवेगळ्या विषयांवर भाष्य केले. युद्ध आणि लष्करी सामर्थ्याबद्दल बोलताना आम्ही शांततेचे पुरस्कर्ते आहोत. आम्ही युद्ध टाळण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. मात्र शांती ही सामर्थ्याशिवाय शक्य होत नाही. कोणी वाकडी नजर करून पाहण्याचा प्रयत्न केला, तर भारतीय सैन्य त्यांना जशास तसे उत्तर देण्यास समर्थ आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.**

यावेळी पुढे बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आपल्यासाठी युद्ध हा कधीच पहिला पर्याय नाही. आपल्या वीरतेमुळे, संस्कारामुळे आपण युद्धाला नेहमीच शेटचा पर्याय समजलेले आहे. लंका किंवा कुरुक्षेत्र असो, येथे आपण नेहमीच युद्ध टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे आपण विश्वशांतीचे पुरस्कर्ते आहोत. आपण युद्धविरोधी आहोत. मात्र शांततेसाठीही सामर्थ्य लागते. आपल्या सैनिकांकडे सामर्थ्य आहे, रणनीती आहे. कोणी आपल्याकडे नजर वाकडी करून पाहण्याचा प्रयत्न केला, तर आपल्या तिन्ही दलाचे सैन्य उत्तर देण्यास समर्थ आहे. शत्रूला त्यांच्याच भाषेत उत्तद देण्यास आपले सैन्य समर्थ आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले. तुमच्या (सैनिक) शौर्यासमोर आकाशदेखील झुकतो. कारगिलचे क्षेत्र भारतीय सेनेच्या शौर्याचे प्रतिक आहे. शिखरावर बसलेला शत्रूदेखील भारतीय सेनेच्या साहसासमोर छोटा होतो. तुम्ही (सैनिक) सीमेचे रक्षक असून देशाचे महत्त्वाचे स्तंभ आहात. तुम्ही देशाच्या सीमेवर आहात म्हणून देशातील लोक सुखात आहेत. देशाच्या सुरक्षेला संपूर्णता देण्यासाठी आपला प्रत्येक नागरिक प्रयत्न करत आहे. देशाची सीमा सुरक्षित असते, अर्थव्यवस्था सुदृढ असते आणि समाज आत्मविश्वासने ओतप्रोत असते तेव्हाच देश सुरक्षित असतो. देशाच्या ताकदीबद्दल ऐकल्यानंतर सैनिकांचेही मनोबल वाढत असेल, असे म्हणत नरेंद्र मोदी यांनी भारतीय सैनिकांची स्तुती केली.



## श्री लक्ष्मीपूजन




# ‘ती’ बँकच अस्तित्वात नाही : शरद पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भू-विकास बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना ९६४ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. तसेच, भू-विकास बँकेकडून सरकारला येणे असलेल्या रकमेमध्ये समायोजित करण्यास सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली होती. त्यावरून आता भू-विकास बँकेच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांनी शिंदे-भाजपा सरकारची पोलखोल केली आहे. शरद पवारांनी पुरंदर येथे शेतकऱ्यांनी संवाद साधला. त्यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की, राज्य सरकारने भू-विकास बँकेचे कर्ज माफ केल्याचे जाहीर केले. गेल्या दहा वर्षात भू-विकास बँकेचे कर्ज एकाला तरी मिळालं का? भूविकास बँक अस्तित्वात आहे का? भूविकास बँक होती का? याची माहिती नाही. २५ ते ३० वर्षे झाली बँकेची कोणी कर्ज वसुली केली नाही. राहिलेली वसुली होणार नाही हे कळल्यावर, कर्ज माफी देण्यात आली. ‘लबाडाच्या घरचे आवताण जरी असले तरी जेवल्याशिवाय खरे नसते’ असे भाजपावल्याचे काम आहे, अशी अशी टीका शरद पवारांनी केली आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सर जो तेरा चकराये ...

आधुनिक केसरी

असे रस्त्यावर बसणारे साधेसुधे न्हावी आणि मोठमोठया वातानुकूलित पार्लरमध्ये बसणारे फाईव्ह स्टार न्हावी यांच्यात काही फार फरक आहे असे मला वाटत नाही. कारण कृती आणि परिणाम तोच असतो. फरक फक्त पैशाचा, आरामशीर बसण्याचा आणि आणखी महागडे साहित्य ती मंडळी वापरतात त्याचा.
माझे लहानपण एका अगदी छोट्याशा खेडेगावात गेले. त्या गावात न्हाव्याचे दुकान नव्हते. वंशपरंपरेने काम करणारे एक न्हाव्याचे घर होते. वयोवृद्ध नथूबाबा, त्यांचा भाऊ पुंडलिक आणि मुलगा हिरालाल असे तिघे जण कार्यरत होते. त्यांच्याजवळ हजामत करण्यासाठीची एक लोखंडी पेटी होती. त्यात साहित्य घेऊन ही मंडळी आमच्या आणि आजूबाजूच्या गावात फिरायची. एक दोन महिन्यात त्यांची फेरी आमच्या घरी असायचीच. घराच्या बाहेरच्या ओट्यावर त्यांची बैठक असायची. बसण्यासाठी एखादा जुना तरटाचा तुकडा अंथरला जायचा. बऱ्याच वेळा लहान मुले आपली मान हवी तशी ठेवत नाहीत म्हणून न्हावी त्यांची मान आपल्या दोन्ही गुडघ्यांमध्ये अशी काही पक्की पकडायचा की त्याला हवी तशी कटिंग झाल्याशिवाय सुटका व्हायची नाही. पण बाजूला मोठी माणसे बसलेली असायची त्यामुळे रडाओरडायची सोय नसायची. ओरडले तर पाठीमागून एखादा धपाटा हमखास ठरलेला असायचा. पण न्हाव्याचे कौशल्य मात्र वादातीत असायचे. बहुतेक वेळा मोठी माणसे त्या न्हाव्याला आपल्या मुलाची चांगली बारीक हजामत कर असे सांगायची म्हणजे निदान दोन तीन महिने काळजी नसायची. **(क्रमशः)**





## आनंदी पहाट

# आनंदातिरेक समाजासाठी घातक ठरू नये

आधुनिक केसरी

लहान वयात मानसिक परिपक्वता कमी असते. अनेक बाबतीत समज, उमज देखील कमीच असते; अर्थात ही उणिव निश्चितच नाही, परंतू त्याकारणाने चांगले-वाईट, खरे-खोटे, आपले-परके, फायदा-तोटा अशा अनेक बाबींचे आकलन त्वरित होत नाही. अनेकदा वाईटच चांगले वाटत असते. म्हणजेच जे नकोय तेच हवे असते. लहान मुलांमध्ये असे चित्र दिसून येणे स्वाभाविकच असते. पण काही प्रमाणांत हे मोठ्यांच्या बाबतीत देखील जेव्हा दिसते तेव्हा मात्र बाल हट्ट केल्यासारखे वागणे ही त्यांच्यातील उणिव असते एवढे निश्चित. मोठ्यांच्या बाल हट्टाचा परिणाम देखील अनेक बाबतीत होतो, अनेकांना त्याचा मानसिक त्रासही होतो. ह्याची जाणीव वेळीच होणे जरुरीचे असते. ह्या हट्टामध्ये समाविष्ट केली जाणारी अथवा अनावधानामुळे संबंधित आर्थिक बाब ही अनेकांची डोकेदुखी ठरते.
अलीकडच्या काळांत साजरे केले जाणारे आप्तेष्टांचे, मित्रमंडळींचे वाढदिवस आणि त्यासाठी मुलांकडून होणारा हट्ट हा त्याचाच एक भाग म्हणता येईल. वाढदिवस पूर्वी देखील साजरे होत असत, परंतू त्याचे स्वरूप अतिशय निराळे होते. अनेकदा ते आपापल्यापरीने घरांतच साजरे होत असत. अलीकडच्या काळांतील वाढदिवस आदल्या दिवशी रात्री बारा वाजल्यापासूनच साजरे व्हायला लागतात. त्या उत्साहात आणि आनंदातिरेकाने इतरांना होणाऱ्या त्रासाचा का बरे विचार होऊ शकत नाही? ह्याची जाणीव घरच्यांकडून अशांना का करून दिली जात नाही? घरच्यांनाच त्याची जाणीव नसणे हीच उणिव म्हणावी लागेल. अशांतता पसरवणाऱ्या ह्या स्पीकर्सच्या भिंतीचा स्वीकार आणि अंगीकार
करणाऱ्यांच्या उणिवा त्यांना दाखवून देणे म्हणजे मांजरीच्या गळ्यांत घंटा बांधण्यासारखेच असते. ह्याचे एकूणच होणारे दुष्परिणाम समजून घ्यायच्या मनस्थितीत अशावेळेस असणारे किती जण असल्याचे दिसते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**सत्कर्माचे सार | परमानंद ||**

**मनोभावे कर्म | करी जो निष्काम ||**
**फळ तया ठाम | प्राप्त होई ||१||**

**श्रध्देचिया पोटी | यशाचे गमक ||**
**जाणी जो शोधक | धन्य होई ||२||**

**कष्टावीन थारा | नसे यशा द्वारी ||**
**आयतोबा घरी | सर्वनाश ||३||**

**किमान गरजा | देती समाधान ||**
**सुखाचे कारण | जाण जीवा ||४||**

**सात्विक मनात | नांदतो ईश्वर ||**
**सत्कर्माचे सार | परमानंद ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरुपण”

आधुनिक केसरी

**आवाहन**

**आता नको करू विलंबे अंबे।**
**जीव भक्ताचा कंठी खोळंबे।।**
**आता नको करू विलम्बे अम्बे ।**
**जीव भक्ताचा कंठी खोळंबे ।।**
**ऐक ऐक माते भक्ताचा टाहो**
**दयेचा झरा तुझा गे वाहो**
**घे उचलूनी त्यासी बाहो**
**चमत्कार दावी कल्पकदंबे।।**
**अपसारी सा-या या आपदा**
**मम चित्त राहो तुझिया पादे**
**आजन्म गाईन मी ऐसी पदे**
**ध्रुवपद देई तू जगदंबे।।**
**विन्ध्यवासिनी कात्यायनी शारदा**
**रोहिणी देवकी यशोदा वरदा**
**सह्यवासिनी रेणुका सर्वदा**
**नमितो हास तुजसी विश्वाम्बे।।**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# परमेश्वराची खरी पूजा



आधुनिक केसरी

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ‘मी साधन करतो’ असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे, चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूती भगवद्‌भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.
भक्ति आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ति, आणि विषयाची अनासक्ति म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ‘रामा! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमय आहेत.’ सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ‘रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे.’ असे आपण मनःपूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.
‘माझ्या देवाला हे आवडेल का ?’ अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे निःसंशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

**– श्री सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**




# संत कान्होपात्रा

आधुनिक केसरी

सर्वत्र भरून राहिला. आपल्या उत्कट भक्तीने चराचर चैतन्याशी ती जोडली गेली आणि अखेर त्या चैतन्याशी एकरूप झाली. आपल्या विठ्ठलाच्या पायाशी तिने देह ठेवला. एक आख्यायिका अशी आहे की, त्यावेळी चंदभागेला प्रचंड महापूर आला. सारं यवन सैन्य वाहून गेलं. विठ्ठल मंदिरही जलमय झालं. चंदभागेतल्या एका खडकाळ जागी आधी तिचं शरीर अडकलं. मग ते महासागराच्या खोल तळाकडे चंदभागेने वाहून नेलं. दुसऱ्या दिवशी पूर ओसरल्यावर तिचा मृतदेह ज्या खडकाळ जागी काही काळ पडला होता तिथे एक तरटी वृक्षाचं रोप उगवल्याचं आढळलं. तो अक्षय तरटी वृक्ष आजही कान्होपात्रेच्या विठ्ठलभक्तीची ग्वाही देत तिथे उभा आहे.
संत कान्होपात्रा ने स्वतःला देवाची वधू म्हणवलं तरी तिचा विठ्ठल तिच्यासाठी आई होता. सखा होता. माय, बाप, बंधू, भगिनी होता. देहाच्या उपाधी सुटाव्या म्हणून देवाकडे प्रार्थना करते. कान्होपात्रेला काय हवं होतं? ‘देगा प्रेमकळा-नाम तुझे’ विठ्ठल तिच्यासाठी कनवाळू, मायमाऊली होता. दासाची कळकळ वागवणारा दीनांचा नाथ, कृपावंत मालक होता.
भक्तांचा दास होता. ज्याच्या प्राप्तीसाठी चारी वेद सहाही शस्त्रं शिणली तो केवळ भक्तीने प्राप्त होतो. ‘अगा वैकुंठीच्या राया, अगा विठ्ठल सखया’ अशी आर्त हाक ती त्याला आपल्या संरक्षणासाठी मारत होती.
कान्होपात्रेच्या अपूर्व भक्तीने अखेर तिला सर्वातून मुक्ती मिळाली. विठ्ठलाचे पाय न सोडता त्याच्या चरणी सहज देहत्याग घडावा हे पराकोटीच्या भक्तीखेरीज अशक्य होतं. कुणी गुरू नाही. काही परंपरा नाही. भक्तीचं वातावरण नाही. अशा परिस्थितीत केवळ आपल्या भक्तीने तिने ईश्वरप्राप्ती करून घेतली. म्हणून संत कान्होपात्रा अद्वितीय ठरते. तिच्या भक्तीमुळे समाजही तिच्या पायाशी नतमस्तक झाला आणि तिला संतपद मिळालं.

## दरीत पडलेल्या बैलाला वाचवण्यासाठी २५ दिवसांपासून जीवाची बाजी

आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** डोंगरावर चरण्यासाठी गेलेला सर्जा नावाचा बैल खोल दरीत कोसळल्याने गेल्या २५ दिवसांपासून दरीत अडकून पडला आहे. पुण्यातील वेल्हा तालुक्यातल्या दुर्गम भागातील रांजणे गावात ही घटना घडली आहे. बैलाच्या काळजीपोटी दरीत दोर लावून खाली उतरत बैलाला जमेल तितका चारा, पाणी औषध, पोहोचवण्याचा प्रयत्न शेतकरी विजय शेंडकर करत आहेत. शेतकऱ्याचे त्याच्या बैलावर असलेले जीवापाड प्रेम आजवर अनेक प्रसंगातून सामोरे आलं आहे. वेल्हे तालुक्यातील दापोडे गावातील शेतकरी विजय मारूती शेंडकर यांचा सर्जा नावाचा बैल रानात चरताना २५ दिवसांपूर्वी रांजणे गावाच्या हद्दीतील दरीत कोसळला. दुर्दैवाने अशा ठिकाणी तो पडला की तेथून त्याला पायवाटेने बाहेर काढणे अशक्य आहे. गेले २५ दिवस शेतकरी विजय शेंडकर आणि त्यांचे कुटुंबीय बैलाच्या काळजीपोटी त्या दरीत दोर लावून खाली उतरत आहेत.



## आ. फारुक शाह यांच्या हस्ते आनंदाचा शिधा वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथे दिवाळीनिमित्त राज्य सरकारच्या "आंनदाचा शिधा" या विशेष योजने अंतर्गत अंत्योदय लाभार्थी आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी रेशन धारकांना शिधा किटचे वितरण धुळे शहर विधानसभा मतदार संघाचे आमदार मा.फारुख शाह हस्ते वाटप करण्यात आले. दिवाळीसाठी राज्य सरकारच्या वतीने जाहीर केलेला आनंदाचा शिधा रविवारपासून लोकांपर्यंत पोहचत आहे. या संदर्भात आमदार फारुख शाह यांनी जिल्हाधिकारी व पुरवठा अधिकारी यांना एका पत्राद्वारे मागणी केली होती की तात्काळ धुळे जिल्ह्यातील व शहरातील नागरीकांना दिवाळीचे कीट वाटप करण्यात यावे या पत्राची दखल घेत जिल्हाधिकारी धुळे यांनी आदेश दिले व कीट वाटप करण्यात आले. दिवाळीसाठी रेशनिंग दुकानातून १०० रुपयांत रवा, साखर, गोडेतेल, चणाडाळ या वस्तू आनंदाचा शिधा म्हणून देण्याची घोषणा सरकारनं केली होती. त्याच पार्श्वभूमीवर धुळे शहरातील शिवाजीनगर झोपडपट्टी दुकान न.३२ येथे आमदार फारुख यांच्या हस्ते दिवाळी किट वाटपाला सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाला जिल्हा स्वस्थ धान्य दुकानदाराचे अध्यक्ष महेश बाबा घुगे, सलीम शाह,एम.आय.एम.चे जिल्हाध्यक्ष नासिर पठाण, शहराध्यक्ष मुक्तार अन्सारी, नगरसेवक सईद बेग मिर्झा,जाहीद हाजी, हलीम समसुद्दिन, आसिफ पोपट शाह, वसिम अक्रम, शाहिद शाह, जलील अन्सारी, अब्दुल शाह, शकीला आपा, अकीला मणियार, छोटु चौधरी आदी उपस्थित होते. या वाटपा दरम्यान सर्व लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता. सदर लाभार्थ्यांकडून या योजनेस उत्तम प्रतिसाद मिळत असून समाधान व्यक्त करीत आहे.




## खाद्यतेल जपून खा! होतेय भेसळ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात तळण्यासाठी खाद्यतेलाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. मात्र, शहरात अधिक नफा कमाविण्यासाठी काही खाद्यतेल विक्रेते तेलात भेसळ करून विकत असल्याचे वास्तव आहे. खुले खाद्यतेल विक्रेते पॅकिंगसाठी टिनाच्या डब्यांचा पुनर्वापर करतात. शेंगदाण्याच्या तेलात कमी किमतीचे तेल मिसळून नफेखोरीचे प्रकार वाढले आहेत. दिवाळीच्या तोंडावर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने (एफडीए) विविध ठिकाणी छापे टाकून १७ लाख ९४ हजार ६७१ रुपयांचा साठा जप्त केला. खाद्यपदार्थात भेसळ करणाऱ्यांच्या विरोधात अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नुसार कठोर कारवाईची तरतूद आहे. तपासणीनंतर अहवाल असुरक्षित असल्याचे पुढे आल्यास न्यायालयीन खटला दाखल केला जातो. तीन लाखांपर्यंतचा दंड आणि कारवासही होऊ शकतो, असे एफडीएकडून सांगण्यात आले.भेसळयुक्त पदार्थ वापरून नागरिकांच्या जिवाशी खेळू नये. तेल विक्रेत्यांनी नवीन डब्यात तेल विकावे, असे आवाहन एफडीएकडून देण्यात आले. खाद्यपदार्थ खरेदी करताना 'बेस्ट बीफोर डेट' तपासून घ्यावी. पक्के बिल घ्यावे. नेहमीच्या दिकानातूनच खरेदी करावे.




## रेल्वेत चोरी करणाऱ्यास अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिकरोड :** गरीब रथ रेल्वे एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या बॅगेतील साहित्य व मोबाइल चोरी करणाऱ्या अट्टल चोरट्यास नाशिकरोड रेल्वे पोलिसांनी अटक केली. रामचंद्र सुभाष कांबळे (वय ३२, रा. रमाबाई आंबेडकरनगर, मालधक्का रोड) असे त्याचे नाव आहे. २१ ऑगस्ट रोजी भुसावळकडे जाणाऱ्या गरीब रथ या वातानुकूलित एक्स्प्रेसमध्ये बुरहद्दीन कादरभाई (रा. नुरानी, मध्य प्रदेश) हे प्रवास करीत होते. त्यावेळी कांबळेने त्यांच्या बॅगेतील मोबाइल व इतर साहित्याची चोरी केली. नाशिकरोड रेल्वे पोलिस ठाण्यात प्रभारी पोलिस निरीक्षक महेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संतोष उफाडे पाटील, दीपक निकम, विलास इंगळे, शैलेंद्र पाटील, आरपीएफचे विशाल पाटील व सागर वर्मा यांनी तपास सुरू केला. त्यांना एक संशयित आढळून आला. चौकशी केली असता त्याने आपले गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून मोबाइल व इतर साहित्य जप्त करण्यात आले. मनमाड येथील न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

# भारत-पाक पुन्हा भिडणार?

आधुनिक केसरी

शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या लढतीत भारताने पाकिस्तानचा पराभव केला. विराट कोहलीच्या घणाघाती खेळीच्या जोरावर भारताने पाकिस्तानचा ४ गडी राखून पराभव केला. गेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताला पाकिस्तानकडून मानहानीकारक पराभव पत्करावा लागला होता. त्याचा बदला भारताने यंदाच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात घेतला. ४ बाद ३१ अशा बिकट अवस्थेतून विराट कोहली आणि हार्दिक पांड्या यांनी सामना अक्षरश: खेचून आणला. त्यांच्या खेळींमुळे भारताने अशक्यप्राय वाटणारा विजय मिळवला. विराट कोहलीच्या नाबाद ८२ धावा, त्याला हार्दिक पांड्याने ४० धावा करुन दिलेली सुंदर साथ यांच्यामुळे टीम इंडियाने विजय साकारला. शेवटच्या ३ षटकांत ४८ धावांची गरज असताना कोहलीने गियर बदलला आणि पाकिस्तानच्या गोलंदाजांची अक्षरश: पिसे काढली. डावाच्या सुरुवातीला भेदक वाटणाऱ्या पाकिस्तानी गोलंदाजांनी विराटसमोर लोटांगण घातले. शेवटच्या षटकात तर हायव्होल्टेज ड्रामा झाला. या षटकात भारतानं दोन फलंदाज गमावले. पण कोहलीने मोक्याच्या क्षणी समयसूचकता दाखवली आणि भारताने रोमहर्षक विजय मिळवला. काल झालेल्या सामन्याच्या आठवणी भारतीय क्रिकेट रसिकांच्या मनात ताज्या आहेत. अनेकांनी तर सामन्याचे हायलाईट्स वारंवार पाहिले आणि कोहलीची खेळी डोळ्यात साठवून घेतली. कालचा रंगतदार सामना पाहता याच स्पर्धेत पाकिस्तान पुन्हा एकदा भारतासमोर येईल का, असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे. पण असे घडण्याची शक्यता कमी आहे. भारत आणि पाकिस्तानची लढत झालीच तर ती केवळ अंतिम सामन्यातच होऊ शकते. त्यासाठी दोन्ही संघांची पुढील कामगिरी उत्तम होणं गरजेचं आहे. भारत, पाकिस्तानच्या गटात बांग्लादेश, दक्षिण आफ्रिका, झिम्बाम्बे, नेदरलँडचा समावेश आहे. भारत आणि पाकिस्तान त्यांच्या गटात टॉप २ वर राहिल्यास त्यांना उपांत्य फेरी गाठता येईल. तिथे त्यांना ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड, श्रीलंका यांच्यापैकी एकाचा सामना करावा लागू शकतो. भारत आणि पाकिस्तानने उपांत्य फेरीत बाजी मारल्यास ते अंतिम फेरीत प्रवेश करतील. त्यानंतर चाहत्यांना भारत वि. पाकिस्तान सामना पाहता येईल. २००७ मध्ये पहिलीवहिली टी-२० विश्वचषक स्पर्धा संपन्न झाली. त्यावेळी भारत, पाकिस्तान एकाच गटात होते. गट साखळीत भारतानं पाकिस्तानला पराभूत केले. सुपर ८ मध्ये भारत न्यूझीलंडकडून पराभूत झाला. पण इंग्लंड, दक्षिण आफ्रिकेचा पराभव करत भारतानं उपांत्य फेरी गाठली. तर पाकिस्ताननं श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, बांगलादेशचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत पाकिस्तानने न्यूझीलंडचा, तर भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान अंतिम फेरीत पोहोचले. हा सामना जिंकत भारताने स्पर्धा जिंकली.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी प्राधिकरण

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापन करताना गड व किल्ल्यांची ऐतिहासिक संपत्ती देशाला दिली आहे. मात्र काळाच्या ओघात गडकिल्ल्यांची होत आहे. ही पडझड थांबविण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने दुर्ग प्राधिकरण स्थापन करण्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच नाशिक येथे केली. वास्तविक राज्यातील गड-किल्ल्यांच्या संवर्धनाची मागणी फार जुनी आहे. राज्यातील शिवकालीन गड, किल्ल्यांचे संवर्धन करून हा ऐतिहासिक ठेवा जपण्यासाठी राज्य सरकारने एक महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी यापूर्वीच छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज आणि दुर्गप्रेमी म्हणून प्रसिद्ध असलेले राज्यसभेचे माजी खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले यांनी केली होती. मात्र याकडे लोकप्रतिनिधी आणि राज्य सरकारांचे दुर्लक्ष झाले. शिंदे सरकार किल्ल्यांच्या संवर्धनासाठी प्राधिकरणाची घोषणा केली आहे. त्याला आता प्रत्यक्ष मूर्त स्वरूप कधी येणार हे पाहावे लागेल.**

यापूर्वी 10 किल्ल्यांचा 'मॉडेल' विकास करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. सध्या रायगड किल्ल्याची डागडुजी सुरू आहे. तिकडे शिवप्रतिष्ठान संस्थेचे प्रमुख संभाजी भिडे यांनी 2017 मध्ये किल्ले रायगडावर 32 मण सोन्याचे सिंहासन पुनर्स्थापित करण्याचा संकल्प सोडला होता. विशेष म्हणजे हा संकल्प शासनाच्या कुठल्याही मदतीशिवाय परवानगीशिवाय साकारला जाणार होता. त्यामुळे या संकल्पाची खूप चर्चा झाली होती. गेल्या पाच सहा वर्षात त्याचे काय झाले कळायला मार्ग नाही. सिंहासनाच्या संरक्षणाची जबाबदारीदेखील प्रतिष्ठानच उचलणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. वास्तविक फक्त सिंहासन सोन्याचे बनवून भागणार नाही तर किल्ल्याच्या संरक्षणाची आणि संवर्धनाची जबाबदारी सगळ्यांनीच घेण्याची गरज आहे. आणि फक्त रायगडच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील किल्ल्यांची संवर्धनाची गरज आहे. किल्ल्यांची फारच वाताहात होत आहे. ती थांबायला हवी आहे. राज्यात फारशी प्रकाशित नसलेल्या किल्ल्यांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणात आहे. त्याकडे ना शासनाचे लक्ष आहे, ना पुरातत्व विभागाचे. त्यामुळे असे किल्ले अडगळीत पडले आहेत. दुर्गप्रेमी, शासन आणि सामाजिक संस्था यांनी मिळून या किल्ल्यांना उर्जितावस्था आणण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. यानंतर एकापाठोपाठ एक असे शेकडो किल्ले त्यांनी जिंकले. हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यात या किल्ल्यांचा सिंहाचा वाटा आहे. हे किल्ले जिंकण्यासाठी,बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरेंसारखे अनेक मावळे धारातीर्थी पडले. शिवरायांचे किल्ले म्हणजे महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवाच; परंतु 350 वर्षांनंतर यातील अनेक किल्ल्यांची आज पडझड होऊन दुरवस्था झाली आहे. किल्ले संवर्धनाच्या माध्यमातून यातील काही किल्ले रोल मॉडेल म्हणून पुढे यावेत, अशी दुर्ग अभ्यासकांची अपेक्षा आहे. शिवकाळात किल्ल्यावर कित्येक महिने पुरेल अशी



अन्नधान्याची व्यवस्था होती, तसेच मंदिर, पाण्याचे तळे, घोड्याची पागा, दारूकोठार अशी स्वतंत्र व्यवस्था होती. महाराष्ट्रात सध्या 410 पेक्षा जास्त ऐतिहासिक किल्ले आहेत. आजही हे किल्ले शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देत दिमाखात उभे आहेत. काही किल्ले चांगल्या अवस्थेत आहेत, तर काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जतमधला रामगड,भूपाळगड असे अनेक किल्ले नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक किल्ल्यांच्या तटबंदी, बुरूज कोसळलेले आहेत. हा ऐतिहासिक ठेवा जपणे शासनासह सर्वांची जबाबदारी आहे. किल्ल्यांच्या संवर्धनातून पर्यटकांची संख्या वाढणार आहे.काही मोजक्याच किल्ल्यांना पर्यटनाच्यादृष्टीने प्रकाशात आणण्यात आले आहे. तसे न करता सगळ्याच किल्ल्यांना शासनाने भरीव सहाय्यता करून त्यांची डागडुजी करण्यावर भर द्यावा. पर्यटनातून उत्पन्न मिळेल.पर्यटनाला चालना मिळेल. पर्यटनासाठी जाणाऱ्या लोकांनीही काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. त्याठिकाणी गेल्यानंतर काही अतिउत्साही मंडळी स्वतः ची नावे तेथे कोरण्याची मर्दुमकी दाखवितात. परंतु शिवरायांनी आपल्या हयातीत एकाही किल्ल्याला स्वतःचे व आपल्या कुटुंबियांचे नाव दिले नाही, हे किल्ल्यावर नाव कोरणाऱ्यांनी लक्षात घ्यावे. किल्ल्यांच्या डागडुजीचे काम पुरातत्त्व विभागाकडे आहे. परंतु त्या विभागाला मिळणारा निधी तुटपुंजा असल्याने मर्यादा येतात. शासनाचे उपेक्षित खाते अशी या विभागाची ओळख बनली आहे. राजस्थान व गुजरात सरकारने किल्लेसंवर्धनातून पर्यावरणवाढीस चालना दिली आहे. मात्र महाराष्ट्राला एवढा मोठा इतिहास असूनही शासनाची याबाबत उदासीन भूमिका असलेली दिसून येते. इथून पुढच्या अनेक पिढ्यांसाठी किल्ल्यांचे जतन करणे गरजेचे आहे.पर्यटनाच्यादृष्टीने किल्ल्यावर शिवसृष्टी तयार व्हावी, जेणेकरून परदेशी पर्यटक अशा ठिकाणी भेट देतील. सध्या गडकोट किल्ल्यांविषयी लोकांना आपुलकी निर्माण झाली आहे. परंतु किल्ल्यांचे पावित्र्य राखणे तितकेच आवश्यक आहे. अनेक स्वयंसेवी संस्था स्वतः किल्लेसंवर्धनासाठी पुढे येऊन किल्ल्यांची स्वच्छता करत आहेत. शिवनेरी किल्ल्यावर पुरातत्त्व विभागाने चांगले काम केले आहे. त्याचप्रमाणे इतर किल्ल्यांकडेही लक्ष द्यायला हवे. सर्व किल्ल्यांची डागडुजी करणे शासनाला शक्य नसले सामाजिक सहभागातून या गोष्टी शक्य आहेत. रायगड, पन्हाळगड, प्रतापगड,राजगड अशा महत्त्वाच्या किल्ल्यांचे जतन करून हे किल्ले रोल मॉडेल म्हणून पुढे येतील, यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत. किल्ले नैसर्गिक अवस्थेत जतन व्हायला हवे आहेत, अशी दुर्गप्रेमींची अपेक्षा आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील निसर्गवेध परिवार संस्थेने किल्ले सफाईची मोहीम हाती घेतली आहे.रांगणा किल्ला दत्तक घेतला असून याठिकाणी स्वच्छतेची कामे नित्यनेमाने केली जातात. शासनाने 10 किल्ले निवडून त्याठिकाणी नैसर्गिक अवस्थेत किल्ल्यांचे जतन करावे, यासाठी शाश्वत गोष्टींवर भर द्यायला हवा.तसेच पर्यटन आणि पुरातत्त्व या दोन खात्यांत समन्वय आवश्यक आहे. पुरातत्त्व खात्यामार्फत पडझड झालेल्या पुरातन वास्तूंचे आहे त्या अवस्थेत जतन केले जाते. पुरातत्त्व खाते व पर्यटन विभाग या दोहोंमध्ये समन्वय गरजेचा आहे. या दोन्ही खात्यांनी शासनाकडे निधीची मागणी करून किल्ल्यावरील पुरातन वास्तूंचे जतन करणे गरजेचे आहे. तरच शिवरायांचा इतिहास जिवंत राहणार आहे.



योगेश गुंजकर
संपर्क 917218786440

# दिवाळी गोड होईल का ?

आधुनिक केसरी

**दिवाळीच्या खरेदीसाठी गर्दी ओसंडून वाहत होती. महागड्या कपड्यांचे दालन जणू मलाच आकर्षित करत होते.माणसांची रेलचेल,त्याचं प्रमाणात बाया देखील खरेदी करण्यास उत्सुक होत्या. बऱ्याच दिवसानंतर बाजारात आलेली म्हातारी माणसं. लहान लहान मुलं. सतत बरसत असलेल्या पावसाने थोडी विश्रांती घेतली होती. या वर्षी दिवाळी अजून दिमाखदार करायची अशी प्रत्येकाने जणू प्रतिज्ञाचं केली की काय असं वाटू लागलं. शेतकरी मायबापाच एवढं नुकसान होऊन सुध्दा तो हसत मुखान येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जातोच कसा? हा यक्ष प्रश्न मला पडत गेला.**

त्या दिवशी दवाखान्याच्या कोपऱ्यात टाकलेल्या बाकड्यावर बसून अंगात जीन्स पॅन्ट आणि हाफ टी-शर्ट असणाऱ्या मुलाला पाहिलं.डोक्यावर लाल मळकट झालेली टोपी, लालभडक अंगात टी-शर्ट, खिशात गायछाप ची पुडी,हातात स्टीलंच मजबूत कड,केस वाढलेले,पायात स्लीपर, काळासावळा पण उंचापुरा,हातात वायर ची थैली घेऊन आलेला तो मुलगा.

(साधारण १७-१८ वर्ष वय असावं त्याच)

अस्ताव्यस्त झालेला तो एकटक त्या दुकानाकड आणि आल्या-गेल्या लोकांच्या पिशव्याकड पाहत होता.

उराशी अनेक स्वप्न बांधून आयुष्याची वाटचाल करणार ते पोर आज कशानं गारठत चाललंय हे मला अद्याप ही माहीत न्हवतं.

आम्ही बराच वेळ बसल्यावर न राहून हाक मारली.

उमेश नाव सांगून त्यानं आमच्याशी मैत्री केली.

बस, चहा घे म्हणताच अजून खुलला. माणसांच्या गर्दीत माणूस असल्यारखी खात्री त्याला वाटू लागली.

आम्ही त्याला विचारत गेलो तो उत्तरत गेला.

मु.पो.राजस्थान होय राजस्थान!

पुढं त्याला काहीच माहीत न्हवतं.

लहानपणीचं आई-वडिलांनी जगाचा निरोप घेतला.

राजस्थान हेच आपलं घर आणि दार इतकंच त्याला माहित होतं.

पोटाची खळगी भरण्यासाठी तो भेटलं ते काम करायचा. कधी दुकानासमोर असलेली घाण उचलायचा तर कधी संडासबाथरूम साफ करायचा.

तो सांगत होता मी ऐकत होतो.

घर-दार,नाते-संबंध तो सगळं सोडून आला होता.

पण म्हणतात ना, 'चित्ती नाही आस त्याचा पांडुरंग दास'



तो इमानदार होता. तो होतकरू होता. तो चोर न्हवता. परिस्थितीन त्याला आरे आणलं होतं.

पण त्या वयात त्याच्या समजदार पणाला दाद द्यावी लागलं. हल्ली वयात आलेली मुलं आपल्या बापाकड हट्ट धरतात.पण या आणि अशा कित्येत मुलांचा बाप (वाली) कोण?

दिवाळी हा सण आनंदाचा; पण असल्या कित्येक मुलांच्या आयुष्यात हा आनंद किती आहे?

गोड वयात कडू झालेली आयुष्याची कहाणी ही दिवाळी गोड करून जाईल का? कचरा गोळा करणारे,

भंगार गोळा करणारे, मागून खाणारे,अंध, अपंग, निराधार, एकटे, परके, शोषित असे कितीतरी मुलं आपल्या आजूबाजूला आहेत.

आपल्या आयुष्याच्या आनंदाचा थोडासा आनंद त्यांना देऊ केला तर नक्कीच त्यांचं आयुष्य दिपमान होऊ शकत.

पण मी त्याला काय देऊ शकत होतो..?

त्याची मला कीव येत होती पण मी त्याला काय देऊ शकत होतो?

मी नोकरदार ही न्हवतो, ना मालकही न्हवतो. पण काहीच नसून मी त्याला थोडीफार मदत करू शकत होतो. त्याची दिवाळी 'गोड' करण्यासाठी काही आर्थिक मदत केली.

आणि मग खऱ्या अर्थाने

***'दिवे जळता दिवे होऊया***
***जळता जळता जग उजळूया'***

हे गीत कानी पडायला वेळ लागणार नाही..

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नवे कपडे मिळाले... अनाथ लेकरांचे चेहरे उजळले !

## वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे 'माणुसकीची दिवाळी' उपक्रम साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** ज्यांचे कोणी नाही, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे या प्रामाणिक हेतू घेऊन वसुंधरा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने गेल्या सात वर्षांपासून 'माणुसकीची दिवाळी' हा अनोखा उपक्रम हाती घेत अनाथ बालकांना दिवाळीनिमित्त नवे कपडे, मिठाई आणि फटाके देऊन हा आनंदाचा उत्सव साजरा केला जातो. यावर्षीही लातूर शहरातील एमआयडीसी भागातील अनाथ मुलींचे निरीक्षण गृह येथे माणुसकीची दिवाळी साजरी झाली. हा उपक्रम लक्ष्मीपूजन अर्थात सोमवारी राबविण्यात आला. वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे अनाथ, दुर्बल आणि उपेक्षित घटकांसोबत दरवर्षी माणुसकीची दिवाळी साजरी केली जाते. अनाथ बालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे हा प्रामाणिक हेतू घेऊन हा उपक्रम गेल्या सात वर्षांपासून सातत्याने राबविला जातो. या उपक्रम अंतर्गत अनाथ बालकांना नवीन कपडे, मिठाई आणि फटाके दिले जातात. जे गरजू आहेत त्यांच्यापर्यंत स्वतः पोहोचून त्यांनाही मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा केला जातो. वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असते. त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी एमआयडीसी येथील मुलींचे अनाथ आश्रम येथे माणुसकीची दिवाळी साजरी करण्यात आली. यावेळी येथील अनाथ मुलींना नवीन कपडे, मिठाई आणि फटाके भेट देण्यात आले. या उपक्रमासाठी सोनाली खानापुरे, रतन झंवर मित्र परिवार, डॉ.अजित चिखलीकर मित्र परिवार, अमोल पोतदार, अक्षय घोगडे, आंनद वेदपाठक, गौस मणियार, दत्ता जाधव यांनी विशेष सहकार्य केले. सिने अभिनेते सचिन दानाई यांच्या हस्ते या भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी वसुंधरा अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा, कार्याध्यक्ष अमोलआप्पा स्वामी, सदस्य गौसपाशा मणियार, दत्ता जाधव, उमेश ब्याकुडे, समर्थ स्वामी, हर्ष ब्याकुडे, श्रेयश शर्मा, निरीक्षण गृहाचे व्यवस्थापक मलवाडे आदींची उपस्थिती होती.



### अंत :करणातून सामाजिक करणारी टीम म्हणजे वसुंधरा : सचिन दानाई

वसुंधरा प्रतिष्ठानचे सामाजिक कार्य खरोखरच उल्लेखनीय आणि प्रेरणादायी आहे . अनाथ आश्रमात स्वत : जाऊन माणुसकीची दिवाळी साजरी करणे म्हणजे या लेकरांप्रती तळमळीने कार्य करणे होय . गेल्या सात वर्षांपासून हा उपक्रम होतोय . याआधीही वसुंधरा प्रतिष्ठानच्या अनेक उपक्रमात मी सहभागी झालो आहे . खरोखरच ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो ही प्रांजळ भावना ठेवून अंत :करणातून निसर्ग रक्षण आणि सामाजिक कार्य करणारी टीम म्हणजे वसुंधरा प्रतिष्ठान होय, अशी भावना सिने अभिनेते सचिन दानाई यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली .

### समाजाचे आपण देणेकरी आहोत : प्रा .योगेश शर्मा

ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण देणेकरी आहोत . दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी वसुंधरा प्रतिष्ठानने अनाथ, दुर्बल आणि उपेक्षित घटकांसोबत 'माणुसकीची दिवाळी' साजरी केली . या अनाथ लेकरांच्या चेहऱ्यावर हास्य पाहून खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी केल्यासारखे आम्हाला वाटते . सर्वांच्या सहकार्याने दिवाळी आम्ही अशा पद्धतीने साजरी करू शकतो . माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी असे उपक्रम होणे काळाची गरज आहे . आमच्या हातून हे कार्य घडते आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो, अशी भावना वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा .योगेश शर्मा यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली .



# विद्यार्थी काँग्रेसतर्फे गरीब मुलांना दीपावलीनिम्मित कपडे, मिठाई भेट

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** लासूर स्टेशन येथील आ. प्रशांत बंब यांच्या कार्यलयाशेजारील मुनोत यांच्या जागेवर पत्र्याचे शेड मारून राहणाऱ्या गरीब मजूर लोकांच्या लहान मुलांना दिवाळीनिम्मित भारतीय विद्यार्थी काँग्रेसच्यावतीने कपडे मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी भारतीय विद्यार्थी काँग्रेसचे हॅन्सीभाई, अमोल कुऱ्हाडे, रांजनगाव पोळचे ग्रा. पं. सदस्य विलास बोडखे, दिनेश सूर्यवंशी, योगेश दरेकर, जाफर शेख, रावसाहेब कुऱ्हाडे यांच्यासह पदाधिकारीची उपस्थिती होती.

# पाऊस गायब; शेतकऱ्यांना दिलासा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात शेतकऱ्यांना दिलासा जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीत महाराष्ट्रातून मोसमी पाऊस परतणार असल्याची हिती हवामान खात्याने दिली आहे.अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे सभापती धरमसिंग चव्हाण सांगितले मागच्या महिन्यांपासून राज्यात मान्सूनने धुमाकूळ घातले होते. दरम्यान परतीच्या पावसानेही राज्यातील विविध भागात पाऊस सुरू होता. नचा परतीचा प्रवास थांबणार अशी माहिती मान खात्याने दिली होती. कालपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. दरम्यान राज्यात थंडीची चाह लागली आहे.संपूर्ण राज्यातून ओलावा कमी होणे म्हणजेच या राज्यातून २०२२ च्या मान्सूनच्या समाप्तीचे ती देण्यात आले आहेत. अशी घोषणा रविवारी हवामान विभागाने केली त्यामुळे मुंबई, पुणेसह संपूर्ण राज्यात (दि.२८) ऑक्टोबरपर्यंत सर्वत्र वातावरण राहील असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.



बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या चक्रीवादळाला थायलंड ने असे (सितरंग) नाव दिले असून रविवारी सकाळीच त्याने वेग घेतला. सोमवारी याचे तीव्र चक्रीवादळात रूपांतर होणार असल्याने भारतीय किनारपट्ट्याना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान मुंबई, पुणे शहरासह महाराष्ट्रातून मान्सून परतीला गेल्याची अधिकृत घोषणा रविवारी हवामान विभागाने केली. त्यामुळे येथून पुढे पाऊस पडलाच तर अवकाळी स्वरूपाचा असेल.बंगालच्या उपसागरात पूर्वमध्य भागात २२ रोजी शनिवारी कमी दाबाचा पट्टा तयार झाला. शनिवारी रात्री त्याचा वेग ताशी ६० ते ७० किमी इतका झाला व रविवारी २२ रोजी सकाळीच त्याचे चक्रीवादळात रुपांतर झाले. सोमवारी २३ रोजी त्याचा वेग तशी ११० किमी राहील त्यामुळे भारतीय किनाऱ्यावर सतर्कतेचा इशारा देण्यात महाराष्ट्राला धोका नाही... हवामान विभागाने जाहीर केल्या प्रम चक्रीवादळाचा महाराष्ट्रात परिमाण याल नाही. चक्रीवादळ बंगालच्या उपसागरातच रा ते भारतीय किनार पट्ट्यात धडकणार नाही अंदाज आहे. मात्र या भागात जोरदार प पडेल. प्रामुख्याने ओडिशा व पश्चिम बंगाल किनारपट्टीवर या चक्रीवादळाचा प्रभाव पडू शकतो.आता सोयगाव परिसरातील शेतकऱ्यांनी जोमाने रब्बी पेरणी करावी अशी माहिती मा.सभापती धरमसिंग चव्हाण सोयगाव यांनी बोलताना सांगितले.



सावळदबारा व परिसरातील नागरिकांना दिवाळी व भाऊबिजेच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
प्रा. योगेश (मनोज) शिवाआप्पा चोपडे
मुख्यधापक, नँशनल मराठी शाळा,
सावळदबारा, ता. सोयगाव, जि.औरंगाबाद,
संपर्क : 9158591222



जय कालंका देवी शिक्षण प्रसारक संस्था सावळदबारा
ता.सोयगाव, जि. औरंगाबाद संचलित,
शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा
कै. लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय सावळदबारा
जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक मोलखेडा
संत सेवालाल महाराज माध्यमिक विद्यालय देव्हारी



संस्थापक अध्यक्ष
कै. लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील



अध्यक्ष
भावराव लक्ष्मणराव कोलते

सचिव
प्राचार्य श्रीमती रत्नाबाई नारायण कोलते

प्राचार्य
नारायण रायभान कोलते

प्राचार्य
एस.टी. काकडे सर

मुख्याध्यापक
जे.एन. पाटील

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू व भगिनी

# कुणी सांगितलं मी म्हातारा झालो, तुम्ही काय बघितलं ?

## शरद पवारांची तुफान फटकेबाजी

आधुनिक केसरी न्यूज




**पुरंदर :** देशाची आणि राज्याची ज्यांच्याकडे सूत्रे आहेत. त्यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या हिताची जपणूक करण्यासाठी काही ठोस पावले उचलण्याची गरज आहे. मात्र, ती टाकण्याची त्यांची तयारी दिसत नाही. माझ्याकडे केंद्राची जबाबदारी होती, तेव्हा तीन महिन्यांच्या आतमध्ये ७२ हजारो कोटींचे कर्ज माफ केले होते, असा दाखला देत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे.

शरद पवार यांनी पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. तेव्हा एका शेतकऱ्याने शरद पवारांना बाहेर न फिरण्याचा सल्ला दिला. त्यावर शरद पवार म्हणाले, जेजुरीच्या सहकऱ्यांनी सांगितले, बाहेर फिरु नये. त्यांना वाटतं मी म्हातारा झालो. कुणी सांगितलं मी म्हातारा झालो, तुम्ही काय बघितले? मी म्हातारा झालो नाही, असे शरद पवारांनी म्हटलं आणि एकच हशा पिकला.

मी केंद्रीय मंत्री असताना देशात फळबाग योजना आणली. त्याअंतर्गत फळबाग घेण्यासाठी आर्थिक सहाय्य केले. कोकणात गेला तर, काजू आणि हापूसाचे हजारो एकर क्षेत्र आहे. एकेकाळी कोकणाचे लोक १६ वर्षे वय झालं की, मुंबईला कामासाठी जायचे. ६० वय झालं की गावाकडे माघारी यायचे. आज मुंबईला जायची भूमिका कोकणातील लोकांची नाही. फळबाग योजनेतून जास्तीत जास्त आंबा, काजू, फणस कसा लावता येईल, यासाठी प्रयत्न करतात," असेही शरद पवारांनी नमूद केलं.


















# कात्रज भागात दहा लाखांचे अमली पदार्थ जप्त



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कात्रज भागात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या एकाला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. त्याच्याकडून दहा लाख रुपयांचे एक किलो २१ ग्रॅम चरस, मोबाइल संच असा साडेदहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सर्फराज मुजफ्फर खान (वय ३५, रा. साईसदन अपार्टमेंट, मांगडेवाडी, कात्रज, मूळ रा. मोहिते कॉलनी, कदमवाडी, कोल्हापूर) याला अटक करण्यात आली. खान याच्या विरोधात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात अमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमली पदार्थ विरोधी पथक कात्रज भागात गस्त घालत होते. मांगडेवाडी परिसरात एक जण चरस विक्रीसाठी आल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून खानला पकडले. खान याच्याकडील पिशवीची झडती घेण्यात आली. तेव्हा पिशवीत चरस सापडले. खान याच्याकडून चरस जप्त करण्यात आले. खान याच्या विरोधात अमली पदार्थ विक्रीचे आणखी काही गुन्हे आहेत का? या दृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील थोपटे, उपनिरीक्षक एस. डी. नरके, संतोष देशपांडे, प्रशांत बोमादंडी, नितीन जगदाळे, युवराज कांबळे आदींनी ही कारवाई केली.

# आदिवासी मुलांच्या वसतिगृहाभोवती घाणीचे साम्राज्य



आधुनिक केसरी न्यूज

**हिमायतनगर :** सामाजिक न्याय विभागा मार्फत चालविण्यात येत असलेले आदिवासी विद्यार्थी वसतिगृह हिमायतनगर येथे मागील ३५ वर्षा पासून कार्यरत आहे. सदर वसतिगृह कै. नागोरावजी धुमाळे माजी जि.प.सदस्य यांनी ग्रामीण भागातील आदिवासी गरिब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी निर्माण व्हावी म्हणून त्यांच्या अथक प्रयत्नातुन कार्यान्वित केले. या वसतिगृहाचा हिमायतनगर तालुक्यातील ग्रामीण भागातील हजारो गरिब विद्यार्थ्यांना फायदा झाला. मागील २० वर्षापासून सदर वसतिगृह उमर चौक परिसरातील सुसज्ज इमारतीत आहे. इमारत परिसरातील अंतर्गत रस्त्यावर नांदेड – किनवट रस्ता दुरूस्तीच्या कामातील शेकडो ब्रास मुरूम परिसरातील अंतर्गत रस्त्यावरच अवैध रित्या साठवला आहे. साठविलेल्या अवैध मुरुमामुळे गटारीतील घाण पाण्याच्या प्रवाह बाधित होवुन ईमारतीच्या बाजूला वळवलेला आहे त्यामुळे घाण, दूषित पाणी साचुन तलावाचं स्वरूप आलेलं आहे. सदर अवैध साठवलेल्या मुरुमामुळे २०० ते २५० मीटर परिसरातील गटारीचे घाण पाणी वसतिगृह इमारती बाजूला साचलेले आहे. वसतिगृहाला पाणीपुरवठा करणारी कुप नलिका या गटारीच्या घाण पाण्यात आली आहे. या पाण्याचा बंदोबस्त करण्याबाबत नगरपंचायत हिमायतनगर यांना लेखी वांरवार कळविण्यात आले आहे तसेच समक्ष भेटुन परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले आहे. हि बाब तहसिल प्रशासनाच्याही निदर्शनास आणून दिली होती दूषित पाण्यामुळे विद्यार्थी व कर्मचारी यांचे आरोग्य धोक्यात आहे.यामुळे गटारीच्या सांडपाण्याची समस्या अधिकच बिकट होणार हे निश्चित. जिल्हाधिकारी हि समस्या कशी सोडवतात याकडे परिसरातील जनतेचे लक्ष लागलेले आहे. रस्त्यावर मुरूम साठवून गटारीचा प्रवाह बदलून वयक्तीक इमारतीकडे वळवता येतो काय? नगरपंचायतला नियमित कर भरतो त्या बदल्यात त्यांनी रस्ता, पाणी , विजेचे दिवे ई. सुविधा पुरवली पाहिजे असे न होता उलट गटारीची पाणी वळवलेले आहे हे कशात बसते यास काय म्हणावे? ( भारत निर्माण )

* विद्यार्थी, कर्मचारी, व परिसरातील जनतेच्या आरोग्याची काळजी न घेता त्यांची गैरसोय करणे हि या टोकाच्या असंवेदनशिलतेला काय म्हणावं ? संत गाडगेबाबाची स्वच्छतेची प्रेरणा स्वतः नगरपंचायत घेणार नसेल तर जनतेसमोर काय आदर्श ठेवणार? लोकसेवकच स्वच्छ भारत, सुंदर भारत संकल्पना कागदावरच ठेवणार आहेत काय ?


या सर्व गोष्टी प्रशासनास कळवून सुद्धा कोणतीच कार्यवाही होत नाही. ७५ व्या अमत महोत्सव वर्ष नंतरही हि बाब होणार असेल तर अंत्यत खेदजनक आहे. भारत शासन असे वागणार असेल तर ब्रिटिश शासन काय वाईट होते ? अशा अनेक समस्या संदर्भात निवेदन देऊन देऊन आम्ही थप्प झालो. आता तरी आम्हाला न्याय मिळेल का ? असा सवाल कांताराव पागोजी धुमाळे यांनी माध्यमानसी बोलतांना केला.


















# मुलीला 'आयटम' म्हणणे तरुणाला पडले महागात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एका १६ वर्षीय मुलीला 'आयटम' संबोधणे एका २५ वर्षीय व्यावसायिकाला चांगलंच महागात पडले आहे. या प्रकरणी पोक्सो न्यायालयाने आरोपीला दीड वर्षांचा तुरुंगवास सुनावला आहे. आरोपीने पीडितेचे केस ओढून तिला "क्या आयटम किधर जा रही हो?" असं विचारलं होतं. 'आयटम' हा शब्द मुलीचा लैंगिक छळ करण्यासाठीच वापरला असल्याचं निरीक्षण नोंदवून न्यायालयाने आरोपीला कठोर शिक्षा सुनावली आहे. २५ वर्षीय आरोपी पीडितेशी लैंगिक संबंध ठेवण्याच्या हेतुनेच तिचा पाठलाग करत होता, असंही न्यायालयाने निदर्शनास आणलं आहे. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला कठोर शिक्षा सुनावली. भविष्यात चांगले वर्तन करण्याच्या आश्वासनावर आरोपीची सुटका करण्यास न्यायालयाने नकार दिला. यावेळी विशेष न्यायाधीश एस जे अन्सारी म्हणाले, "अशा गुन्ह्यांत कठोर कारवाई करणं आवश्यक आहे. महिलांचे संरक्षण करण्यासाठी आणि रोड रोमियोंना धडा शिकवण्यासाठी अशा शिक्षेची गरज आहे.

# सातपूर औद्योगिक वसाहतीत विजेची हेराफेरी?

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सातपूर औद्योगिक वसाहतीत एका कंपनीच्या वीज जोडणीवरून दुसऱ्या कंपनीने जोडणी घेत सुमारे चार वर्षे स्वतःचे देयक दुसऱ्याला भरायला लावत सुमारे ५० लाखाची फसवणूक केल्या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारात महावितरणचा वायरमन सहभागी असण्याची शक्यता वर्तविली गेली आहे. सातपूर औद्योगिक वसाहतीतील ६८-चार या भूखंड क्रमांकावर हा प्रकार घडल्याचे बिरेंद्रकुमार झा यांनी तक्रारीत म्हटले आहे. या ठिकाणी झा यांची एशियन इको लाईटिंग कंपनी आहे. २०१३ मध्ये त्यांनी एशियन इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या मालकांशी करारनामा करून ही कंपनी घेतली.















# आजपासून सिडकोचा दिवाळी धमाका

आधुनिक केसरी न्यूज

**नवी मुंबई :** लक्ष्मी पूजनाच्या शुभ मुहूर्तावर सिडकोने पुन्हा ७,८४९ घरांच्या विक्रीचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते केला. या वर्षात सिडकोने ही तिसऱ्यांदा सोडत काढली आहे. त्यामुळे विविध आर्थिक स्तरातील नागरिकांना परवडणाऱ्या दरातील घरे उपलब्ध करून देण्यामध्ये सिडको महामंडळ संपूर्ण देशात अग्रेसर आहे असे प्रशंसोद्गगार मुख्यमंत्री शिंदे यांनी काढले. सिडकोने दिपावलीच्या मुहूर्तावर २४ ऑक्टोबर रोजी ७,८४९ घरांच्या विक्रीचा प्रारंभ करण्यात आला. सिडकोच्या या महागृहनिर्माण योजनेतर्गत नवी मुंबईतील उलवे नोडमधील बामणडोंगरी, खारकोपर पूर्व2ए, खारकोपर पूर्व २बी आणि खारकोपर पूर्व पी३ येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांकरिता परवडणाऱ्या दरातील ७,८४९ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २५ ऑक्टोबर २०२२ पासून सुरुवात होणार आहे.














# बिबट्याच्या हल्ल्यात गमावला जीव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गोरेगावमधील आरे कॉलनी परिसरात सोमवारी सकाळी बिबट्याच्या हल्ल्यात एका दीड वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू झाला. इतिका अखिलेश लोट, असे या मुलीचे नाव आहे. या हल्यानंतर परिसरातील स्थानिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालं आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. आरे कॉलनीमधील वस्त्या, पाड्यांवर बिबट्याचा मोठ्या प्रमाणावर वावर असतो. अधूनमधून बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनाही घडत असतात. सोमवारी ( २४ ऑक्टोंबर ) सकाळी ६.३० च्या सुमारास आरे दुग्ध वसाहतीतील युनिट क्रमांक १५ मध्ये वास्तव्यास असलेले अखिलेश लोट यांची दीड वर्षाची मुलगी इतिका गायब झाली. त्यामुळे लोट कुटुंबिय आणि त्यांच्या शेजारच्या रहिवाशांनी घराच्या आसपास आणि जंगलात इतिकाचा शोध घेण्यास सुरुवात केली. काही वेळाने घरापासून काही अंतरावर इतिका जखमी अवस्थेत सापडली. तिला तात्काळ सेवन हिल्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारापूर्वीच



तिचा मृत्यू झाल्याने डॉक्टरांनी घोषित केलं. ऐन दिवाळीत अशी दुर्घटना घडल्याने आरे परिसरात शोककळा पसरली आहे. दुसरीकडे आरे कॉलनीत बिबट्याचे हल्ला वाढल्याने परिसरातील स्थानिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालं आहे.






# एसटी स्थानकांच्या आवारात दलालांची 'घुसखोरी'; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दिवाळीनिमित्त परवागी जाण्यासाठी एसटी स्थानकाच्या आवारात आलेल्या प्रवाशांना गाठण्यासाठी खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांनी दलाल नेमले असून, त्यांचा वावर वाढला आहे. या दलालांकडून प्रवाशांची फसवणूक करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यांना अटकाव करणाऱ्या स्वारगेट एसटी स्थानकातील नियंत्रकाला शिवीगाळ करुन धक्काबुक्की केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी चौघाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वारगेट, पुणे रेल्वे स्थानक; तसेच शिवाजीनगरमधील वाकडेवाडी स्थानक परिसरात खासगी प्रवासी वाहतूकदारांच्या दलालांचा वावर असतो.




















# ‘फिलिप्स’कडून चार हजार कर्मचारी कपात करण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** तंत्रज्ञान कंपनी फिलिप्सने एक निवदेन जारी करत लवकरच चार हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढणार असल्याची घोषणा केली आहे. मागील काही महिन्यांपासून कंपनीला मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. तसेच कंपनीच्या उत्पन्नावरही मोठा प्रभाव पडला आहे. त्यामुळे हा निर्णय घेत असल्याचे सांगण्यात आले आहे.




















## पाकिस्तानी पत्रकाराची गोळ्या झाडून हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पाकिस्तानी पत्रकार अर्शद शरीफ यांची केनियामध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. पोलीस चकमकीत त्यांचा मृत्यू झाल्याचं सांगितलं जात आहे. त्यांच्या पत्नीने या वृत्ताला दुजोरा दिला आहे. “कृपया आमच्या कुटुंबाच्या गोपनीयतेचा आदर करा. ब्रेकिंग न्यूजच्या नावाखाली आमच्या कुटुंबाचे फोटो, खासगी माहिती आणि रुग्णालयतील अखेरचे फोटो दाखवू नका, अशी विनंती त्यांनी केली आहे. मी माझा मित्र, पती आणि आवडत्या पत्रकाराला आज गमावलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केनियामध्ये त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली,” असं ट्वीट अर्शद शरीफ यांची पत्नी झवेरिया सिद्दिकी यांनी केलं आहे. अर्शद शरीफ यांना हत्येची भीती असल्याने पाकिस्तान सोडून दुबईत वास्तव्य केलं होतं. त्यांच्या काही जवळच्या मित्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाळत ठेवली जात असल्याचा संशय आल्याने त्यांनी दुबईही सोडली होती. अफगाणिस्तानच्या हल्लेखोरांनी त्यांच्या हत्येचा कट रचल्याची माहिती आहे. नैरोबी येथील बाहेरच्या भागात शरीफ यांची हत्या करण्यात आली.


# अमरावतीमध्ये बडनेराजवळ मालगाडीचे २० डबे रुळावरून घसरले, वाहतूक विस्कळीत

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** दिवाळीच्या दिवशी नागपूर-भुसावळ मार्गावरील मालखेडनजीक कोळशाच्या मालगाडीचे २० डबे रुळावरून घसरले. सुदैवाने यात कोणत्याही स्वरुपाची जीवितहानी झाली नाही. या अपघातामुळे ५६ गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला असून १२ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत, तर इतर गाड्यांचा मार्ग वळवण्यात आला आहे. सध्या रेल्वेकडून बचावकार्य सुरू आहे. रेल्वे मार्ग अद्याप पूर्ववत झालेला नाही. हा अपघात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडला. मिळालेल्या माहितीनुसार, मालगाडी रुळावरून घसरल्याची घटना मालखेड ते टिमटाला रेल्वे स्थानकांदरम्यान घडली. येथे मालगाडीचे २० डबे रुळावरून घसरले. स्थानिक रेल्वे कर्मचाऱ्यांनी याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर लगेचच विभागाचे कर्मचारी आणि तंत्रज्ञ घटनास्थळी पोहोचले आणि मदतकार्य सुरू केले. २८४५ पुणे-हटिया एक्स्प्रेस, १२२६१ सीएसएमटी-हावडा एक्स्प्रेस, १२१३९ सीएसएमटी-नागपूर या तीन एक्स्प्रेस गाड्या चांदूर बाजार ते नरखेड मार्गे वळवण्यात आल्या आहेत. २२८४७ विशाखापट्टनम-एलटीटी, १२६५६ चेन्नई-अहमदाबाद एक्स्प्रेस नागपूर-नरखेड-चांदूरबाजार-बडनेरामार्गे वळवण्यात आली आहे. याशिवाय ११२२२ वर्धा-भुसावळ पॅसेंजर, १२१४० नागपूर-सीएसएमटी एक्स्प्रेस धामणगाव ते नागपूर परत आणि रद्द, १२११९ अमरावती-नागपूर, ११०४० गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्स्प्रेस, ०१३७२ वर्धा-अमरावती, १७६४२ नरखेड-काचीगुडा, ११२२१ भुसावळ-वर्धा, १२१०६ गोंदिया-सीएसएमटी, १२१३६ नागपूर-पुणे, १२१२० अजनी-अमरावती, १२१४० नागपूर-सीएसटीएम, ०१३७४ नागपूर-वर्धा या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

२०८१९ पुरी-ओखा वाडी-दौंड-मनमाड-जळगाव मार्गे, १२६५६ चेन्नई-अहमदाबाद नरखेड-चांदूर बाजार-बडनेरा मार्गे, १२८३४ हावडा-अहमदाबाद पुलगाव-नागपूर-नरखेड-चांदूर बाजार-बडनेरा मार्गे, १२८६० हावडा-सीएसटीएम नागपूर–चांदूर बाजार-बडनेरा मार्गे, १२१२९ पुणे-हावडा मार्गे बडनेरा-चांदूर बाजार-नागपूर, १२८४४ अहमदाबाद-पुरी बडनेरा-चांदूरबाजार-नरखेड-नागपूरमार्गे, १८०२९ एलटीटी-शालीमार बडनेरा-चांदूर बाजार-नागपूर मार्गे वळवण्यात आल्या.















# सध्या राज्यात सरकार नसून एक व्यवस्था : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सध्या राज्यात सरकार नसून ती एक व्यवस्था आहे. आता त्यांनी शपथ घेतली आहे. तर त्यांनी काम करावं. आता डबल इंजिनच काम सुरू आहे त्यामुळे अन्याय होत असतो, अशीही टिप्पणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्य सरकारवर केली. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या भारत जोडो यात्रेबाबत माहिती देण्यासाठी साताऱ्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई, जिल्हा महिला अध्यक्षा अल्पना यादव, रजनी पवार, धनश्री महाडिक, ॲड. दत्तात्रय धनावडे, मनोहर शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. राज्यातील शाळा बंद करण्याचा निर्णय हे शिंदे-फडणवीस सरकार घेत आहे. या सरकारचे धोरण शिक्षण विरोधी आहे. आजच्या आज या सरकारने हा निर्णय मागे घ्यावा, अशी आमची मागणी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुजरातच्या हिताचे आणि महाराष्ट्रावर अन्याय करणारे घेत आहेत. त्यास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुकसंमती देत आहेत. अनेक प्रकल्प गुजरातला जात आहेत. त्याबाबत ते ब्र शब्द काढत नाहीत. राज्यात पावसाने शेतकऱ्यांना हैराण केले आहे. शेतकरी जनता होरपळतोय याकडे सरकारचे लक्ष नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे मात्र सण उत्सव मोठया उत्साहाने साजरा यामध्ये दंग आहेत. त्यांनी ओला दुष्काळ जाहीर करावा अशी आमची मागणी आहे, असेही चव्हाण म्हणाले.

